


Rajiv Gandhi Mahavidyalaya, Mudkhed & SRTM University jointly Organized

# One day Interdisciplinary National Conference on Contemporaneity of Gandhian Thoughts: Reality & Distortion

**1st October, 2019**



Organized By:

**Department of Political Science**

Shri Sharda Bhavan Education Society's

**Rajiv Gandhi Mahavidyalaya,**
**Mudkhed, Dist. Nanded- Maharashtra -India**


Edited by
Dr Ramesh Kadam
Dr Dattaji H. Mhetre

२५. महात्मा गांधीजींचे सामाजिक विचार-आकाश शेषराव बांगर ६८

२६. महात्मा गांधीजींचे राजकीय विचार - अनघा देशमुख ७०

२७. महात्मा गांधीजीचे राजकीय विचार : एक अभ्यास- प्रा.डॉ.बी.एम.नरवाडे ७२

२८. 'सत्याग्रह' एक शास्त्र- डॉ.भुजंग विठ्ठलराव पाटील ७६

२९. महात्मा गांधीजीचे शैक्षणिक विचार- प्रा.डॉ. बोचरे जे.एम. ७९

३०. महात्मा गांधी यांच्या विचारातील राजकीय संदर्भ-प्रा. डॉ. बोरोळे रजनी अनंतराव ८२

३१. महात्मा गांधीजी आणि राष्ट्रवाद-प्रा.चव्हाण देविदास गोविंदराव ८६

३२. स्वावलंबी ग्रामस्वराज्याचे उद्‌गाते : म. गांधी- डॉ. शिवाजी हरी चौगुले ८८

३३. महात्मा गांधीजीचे सामाजिक विचार - देशमुख गंगाधर बालाजीराव ९१

३४. महात्मा गांधी आणि डॉ. आंबेडकर यांचे तुलनात्मक विचार - प्रा.डॉ. बनसोडे विलास भारतराव ९३

३५. महात्मा गांधीचे विचार आणि २१ व्या शतकातील आंतराष्ट्रीय वाद आवस्था-डॉ. भांगे चंद्रकांत बन्सीधर ९६

३६. म.गांधीजीचे शैक्षणिक विचार-प्रा.पांडुरंग नेवरकर ९९

३७. महात्मा गांधीजीचे राजकीय विचार- प्रा.डॉ.विलास कऱ्हाळे १०१

३८. गांधी आणि मार्क्स यांच्या अराज्यवादी विचारांची तुलना-डॉ.फुके वृषाली लक्ष्मीकांत १०३

३९. महात्मा गांधीजीच्या विचाराची मौलिकता-डॉ.राम फुन्ने १०६

४०. महात्मा गांधी यांच्या विचारांची सद्यकालीन प्रस्तुतता-डॉ.गणेश गंगाधर शिंदे १०८

४१. महात्मा गांधीजी यांचे राजकीय विचार एक सिंहावलोकन-प्रा.डॉ.हारगे महादेव माणिकराव ११०

४२. गांधीवाद आणि आंबेडकरवादामधील अंतस्थ भेद- प्रा.डॉ. आनंद गो. इंजेगावकर ११२

४३. महात्मा गांधी सनातनी हिंदू आणि दुटप्पी होते; असे आंबेडकराना का वाटायच :
डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २६ फेब्रुवारी १९५५ ला बी.बी.सी.
रेडीओला दिली मुलाखत. - प्रा. डॉ. जे. टी. कांबळे ११४

४४. 'महात्मा गांधीचे सामाजिक, राजकीय व शैक्षणिक विचार'-जयश्री पंडीतराव पोटपल्लेवार ११८

४५. गांधीवाद आणि मार्क्सवाद -डॉ ज्योती व्ही. कवठे १२१

४६. महात्मा गांधीजी आणि शाश्वत विकास-प्रा. केदार रविंद्र केंद्रेकर १२५

४७. महात्मा गांधी आणि महिलांचे सबलीकरण-प्रा. सविता कोकाटे परांडे १२७

४८. महात्मा गांधीजी यांचे राजकीय विचार-डॉ.पी.एस.लोखंडे १२९

# महात्मा गांधीजी यांचे राजकीय विचार

## एक सिंहवलोकन

प्रा. डॉ. हारगे महादेव माणिकराव
रामकृष्ण परमहंस महाविद्यालय उस्मानाबाद
मो. न. ८६९८२९००५५
Email - mahadev.harge@gmail.com

म. गांधी हे भारतीय स्वतंत्र्य संग्रामातील प्रमुख नेते व तत्वज्ञ होय. अहिंसात्मक मार्गांनी स्वतंत्र्य मिळवियासाठी त्यांनी संपुर्ण जगाला प्रेरीत केले. रवींद्रनाथ टागोर यांनी सर्वप्रथम त्यांना महात्मा ही उपाधी दिली. भारतातील लोक प्रेमाने त्यांना राष्ट्रपिता म्हणुन संबोधले. गांधीजीचा जागतिक राजकारणाच्या जळवळीवरही फार खोल ठसा उमटला होता. अधुनिक राजकीय विचार सरणीवर मोहनदास करमचंद गांधी यांचे नाव असाधरण स्वरुपाचे आहे. लौकिक अर्थाने म. गांधी हे तसे विचारवंत नसतीलही तरीपण राजकिय विचारात त्यांनी मोलाची भर घातली आहे यात शंका नाही.

म. गांधी यांचा जन्म २ ऑक्टोंबर १८६९ रोजी गुजरातमधील पोरबंदर येथे झाला. गांधीजींच्या जीवनावर त्यांच्या घरातील वातावरणाचा फार मोठा परिणाम झाला. परदेशात वकिलीचे शिक्षण घेऊ परत ते भारतात आले. गुजरातमध्ये काही काळ वकिलीही केली. त्यानंतर एक विशिष्ट दावा चालविण्यासाठी त्यांना आफ्रिकेतही जावे लागले. हीच घटना त्यांच्या आयुष्याला वेगळे वळण देण्यास कारणीभुत ठरली निग्रो आणी काळया रंगाच्या लोकांवर तेथे खुप अन्याय, अत्याचार गोरे लोक करत होते. हे पाहुन गाधीजींचा संताप अनावर झाला. या दु:खाला वाचा फोडलीच पाहिजे या निश्चयाने त्यांनी तेथे नाताळ कॉग्रेसची स्थापना केली आणि गोऱ्या लोकांविरुध्द लढण्यासाठी एक नवे शस्त्र शोधून काढले ते शस्त्र म्हणजे सत्याग्रह होय.

सत्याग्रहाच्या या मार्गाचे प्रवर्तक गांधीजी १९१५ साली भारतात आले आणि अल्पकाळातच त्यांनी भारतातील राजकारणावर आपला प्रभाव पाडला. भारतातील लोक आणि नेते गांधीजींच्या लढयाकडे आकृष्ट झाले. १९२० मध्ये लो. टिळकांच्या मृत्युने एका युगाचा अंत झाला आणि त्याचवेळी एका नव्या युगाचा प्रारंभ झाला. आपण त्याला गांधीयुग म्हणतो. गांधीजींचे नेतृत्व उदयाला आल्यानंतर कॉंगेसच्या स्वरुपात अमुलाग्र बदल घडुन आला. म. गांधीजींचे स्वत:चे जीवन हा सत्यशोधन्यासाठी केलेला एक महान प्रयोग होता. गांधीजीं जे बोलले त्याप्रमाणे त्यांनी आचरण केले. त्यांचे तत्वज्ञान हे जीवनात त्यांनी घेतल्या प्रत्यक्ष अनुभवावर आधारीत होते. काही मुलभूत तत्वावर श्रध्दा ठेवुन त्या आधारे जीवनातील समस्याची उकल करण्याचा गांधीचा प्रयत्न होता.

गांधीजींच्या राजकीय विचारात धर्म व नैतिकतेला त्यांनी महत्व दिले. म. गांधीच्या विचारावर जैन,बौध्द धर्मांचा प्रभाव असल्याने त्यांनी सत्य आणि अहिंसेला आपल्या विचारांचो मुलभूत सुत्रे मानलीत. धर्मविना राजकारण म्हणजे आत्मविना शरीर ते मनतात. धर्म आणि राजकारण याची ते फारकत करत नाही. मानवाच्या सामाजीक, आर्थिक व राजकिय कार्याला एकमेकापासून वेगळे करता येत नाही. धर्माचा संबंध कर्तव्यशी जोडल्याने समाजाविषयीच्या कर्तव्य भावनेने केलेले कार्य म्हणजे राजकारण होय. गाधीजीच्या विचारांना नैतिक व अध्यात्मिक अधिष्ठान प्राप्त झालेले नाही. गांधीजी वृत्तीने धार्मिक होते परंतु धर्माबद्दलची त्यांची कल्पना व्यापक व मानवतावादी होती. त्यात सांप्रदायीक दृष्टीकोन नव्हता. धर्म म्हणजे केवळ इश्वराची उपासना आणि धार्मिक कर्मकांड नसुन नैतिक कर्तव्याचे पालन म्हणजे धर्माचरण असा व्यापक दृष्टिकोण त्यांना अभिप्रेत होता.

हिंदु- मुस्लिम एकतेसाठी म. गांधीने प्रयत्न केले होते. भारतात हिंदु हे बहुसंख्य आहेत. आणि मुस्लिम हे अल्पसंख्यांक आहेत हिंदु- हा भारतातील प्रश्न अतिशय गंभीर स्वरुपाचा आहे. हिंदु- मुस्लिम ऐक्य प्रस्थापित व्हावे हे त्यांचे महत्वाचे असे एक स्वप्न होते. गांधी हे हिंदु असले तरी हिंदु- राष्ट्राची कल्पना त्यांनी कधीच मान्य केली नाही. जीनांनी माडलेला द्विराष्ट्रवाद त्यांना मान्य नव्हता. ज्याप्रमाणे एक म्यानात दोन तलवारी राहु शकत नाहीत. त्याप्रमाणे एका राष्ट्रात हिंदु व मुस्लिम ही दोन राष्ट्रे राहु शकत नाहीत. ही जीनांची विचारसरणी होती. ती अर्थातच गांधीजींना अमान्य होती.

सत्याग्रह ही गांधीजींनी या देशाला दिलेली एक महत्वपुर्ण राजकिय देणगी आहे. महात्मा गांधीजीच्या तत्वज्ञानात सत्याग्रहाला अतिशय महत्वाचे स्थान आहे. असे म्हणटले जाते की सत्यागृहाची कल्पना म्हणजे राजकीय विचार आणि व्यवहार यांचा अपुर्व मिलाप होय. जुन्या काळात सत्याग्रहाचा विचार सामाजीक पातळीवर प्रत्यक्षात आणला जात होता. गांधीजींनी मात्र त्याला राजकीय पातळीवर नेहुन सोडले. गांधीजी म्हणतात की सत्य व प्रेम हा सत्याचा मुलमंत्र आहे. सत्याग्रही कधीही निराश होत नाही. तो फक्त एवढेच जानतो की सत्यासाठी सतत आग्रह धरला पाहिजे, भांडत राहिले पाहीजे राजकीय क्षेत्रात सर्वत्र अन्याय, जुलुम, शोषण व छळ यांचे राज्य चाललेले आहे त्यासंदर्भात निराश न होता याविरुद्ध लढा उभारला पाहिजे व तोच खरा सत्याग्रह होय. प्रतिपक्षाच्या अंत:करणावर विजय मिळविण्यासाठी आत्मक्लोषाचा सत्याग्रह हा एक प्रभावी असा मार्ग आहे.

गांधीजींनी सत्य व अहिसेसंबंधी फार मोलाचे विचार मांडले आहे. सत्य व अहिंसेचा पुजारी असे गार्धीचे वर्णन केले जाते. गांधीना जागतिक किर्ती प्राप्त झाली. कारण गांधी सोडुन कोणत्याही अन्य नेत्याने स्वतंत्र्य लढयात सत्य व अहिंसा या मुल्यांचा आग्रह धरलेला आढळुन येत नाही.

व्यक्तीच्या सर्वांगीन विकासासाठी स्वतंत्र्याची आवश्यकता असते. म. गांधी व्यक्ती स्वतंत्र्यावर विशेष भर देऊन स्वतंत्र्याची संकल्पना अधिक व्यापकपणे मांडली आहे. व्यक्ती सर्वशृंखलातुन मुक्त होणे म्हणजेच स्वातंत्र्य होय. असे गांधीना अभिप्रेत होते. खऱ्या अर्थाने गांधीजीना राज्य व शासन संस्था यांची आवश्यकता वाटत नव्हती तरीही तात्पुरत्या काळासाठी व्यक्तीचा पुर्ण विकास होईपर्यंत त्यांनी लोकशाही शासन योग्य असल्याचे म्हटले आहे. कारण सर्वसामान्य लोकांच्या हाती सत्ता देणारी शासनपध्दती म्हणजे लोकशाही असे ते मानत.


गांधीजींचे विचार हे स्वातंत्र्यपुर्व कालखंडातील त्या परिस्थीतीला अनुसरुन मांडलेले विचार आहेत. असे आपल्याला वाटते. परंतु गांधीचे हे विचार चिरकाल टिकणारे आहेत. वेगवेगळया अंगानी गांधीजीचा विचार सागण्याचा अनेकांचा प्रयत्न असतो. काहीजण त्यांच्या विचारांचं समर्थनही करतात. तसं पाहिलं तर गांधीजीचे विचार हे खुप, पशंसनीय आहेत. एकुणच मानव जातीच्या कल्याणया दृष्टीकोणातुन त्यांनी आपले विचार मांडले. अहिंसा आणि सत्याग्रहाचा मार्गाने अत्यंत लहरी व जुलमी शासन सुध्दा उखलवुन टाकत येते हे त्यांनी प्रत्यक्षपणे सिध्द करुन दाखविले व्यक्तीस्वातंत्र्य बंधुभाव, लोकशाही, विकेंद्रीकरण आणि ग्रामराज्य इत्यादींना फारच महत्वाचे स्थान त्यांनी आपल्या राजकीय विचारसारणीत दिले. भारतीय राजकारणावर, भारतीय राज्यघटनेवर त्यांचा फार मोठा परीणाम झाला आहे. हे दिसुन येते ग्रामिण भागाचा विकास झाला तरच देशाची प्रगती होईल हे त्यांनी आपल्या खेडयाकडे चला या विधानावरुन दाखवुन दिले. कारण आज ग्रामीण भागात सत्तेचे विकेंद्रीकरण होऊन स्थानिक स्वराज्य संस्थाना शासनाने अनेक अधिकार दिलेले आहेत.

त्यामुळेच ग्रामीण भागाचा विकास आज मोठया प्रमाणात होत असतेला दिसुन येतो. ग्रामीण भागात लघुद्योगाला महत्व गांधीनी दिले,पाहिजे असा विचार त्यांनी सांगीतला आणि आज आपण पाहतो शहरी भागातले उद्योग हे कशा स्वरुपाचे झाले आहेत. शहरीकरणामुळे पर्यावरणावर मोठा विपरीत परीणाम झालेला आज पहावयास मिळतो. लघुद्योगामुळे खेडे सयंपुर्ण होतील त्याची आर्थिक क्षमता वाढेल, लोकांना गावातच कामे मिळतील त्यामुळे बेरोजगारी निर्माण होणार नाही हे त्योच भाकीत आज खरे ठरते आहे. एकुणच गांधी विचाराची आज फारच आवश्यकता आहे. राजकीय व सामाजिक क्षेत्रातील एक क्रियाशील साधक असल्यांचे वर्णन राघवन आय्यर करतात. तर आईन्स्टाईन म्हणतो की विसाव्या शतकात तुम्हाला अनुबाँब किंवा गांधीजी यापैकी एकाची निवड करावी लागेल अर्थातच विध्वंस नको असेल तर गांधीजीच सर्वांना सर्वत्र श्रेयस्कर ठरतील. एकंदरीत आज सर्वत्र हिंसाचार, अनाचार, साधन सुचितेचा त्याग, शोषण, परदेशीचा स्वीकार, स्वार्थ या सर्व अनिष्ठांचा उत अलेला असताना गांधीजींचे विचार जगाला तारक ठरु शकतील. एक मार्गदर्शक दीपस्तंभ म्हणुन उपयुक्त ठरतील यात शंका नाही.

**संदर्भ :-**

१. डॉ. रमेश डोबळे, भारतीय राजकीय विचारवंत
२. र. घ. वराडकर भारतीय राजकीय विचारवंत
३. कृ. दि. बोराळकर भारतीय राजकीय विचारवंत
४. डॉ. वा. भा. पाटील भारतीय राजकीय विचारवंत.


ISBN : 978-81-922248-8-6



Shri Sharda Bhavan Education Society's

# Rajiv Gandhi Mahavidyalaya, Mudkhed & SRTMU, Nanded

## Jointly Organized

### One Day Interdisciplinary National Conference on

## Contemporaneity of Gandhian Thoughts : Reality & Distortion

# Certificate

This is to certify that Prof. / Dr. / Mr. / Ms. प्रा.डॉ.हारगे महादेव माणिकराव

of रामकृष्ण परमहंस महाविदयालय, उस्मानाबाद attended

one day Interdisciplinary National Conference on **Contemporaneity of Gandhian Thoughts : Reality & Distortion** Organized by the Department of Political Science, Rajiv Gandhi Mahavidyalaya, Mudkhed, Dist. Nanded on 1st october, 2019. he / She Chaired Session / Presented Paper / Delivered Lecture on

महात्मा गांधीजी यांचे राजकीय विचार एक सिंहावलोकन


**Dr. Dattaji H. Mhetre**
Convener
Head, Dept. of Political Science

**Dr. Ramesh Kadam**
Chief Organizer
Principal, Rajiv Gandhi Mahavidyalaya, Mudkhed.

# विद्यावार्ता®

MAH... 03051/2012
ISSN... 9318
SPECIAL ISSUE...

Peer Reviewed International Refereed Research Journal






**शंकरराव पाटील महाविद्यालय, भूम व**
**डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद**
यांच्या संयुक्त विद्यमाने

## ''राजर्षी शाहू, महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान'' या विषयावर

## एक दिवसीय राष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद

प्राचार्य
डॉ.श्रीकृष्ण चंदनशिव



12) महात्मा फूले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे साहित्यविषयक विचार
**प्रा.डॉ. सुर्यवंशी रामहरी मधुकर, उस्मानाबाद** ||43

13) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार : एक विश्लेषण
**प्रा.डॉ. विवेक अ. चौधरी, अमरावती** ||45

14) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जमीन हक्कासंबंधी भूमिका व मार्गदर्शन
**डॉ. वाघमारे विष्णु बब्रुवान, सोलापूर** ||48

15) शाहू महाराजांच्या सामाजीक व आर्थिक विचारातील मानव विकास संकल्पना
**प्रा. यादव जे. बी., डॉ. आगळे एस. व्ही, बीड** ||51

16) छत्रपती राजर्षी शाहु महाराज यांचे शैक्षणिक कार्य
**प्रा.डॉ. हारणे महादेव माणिकराव, उस्मानाबाद** ||54

17) महात्मा फुले यांचे स्त्रीविषयक विचार
**प्रा.डॉ. पवार विद्युलता शाहूराव, कळंब** ||56

18) महात्मा फुले : स्त्रियांचे आद्य उद्धारक
**प्रा. सौ. बेटकर व्ही. सी., उदगीर** ||58

19) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राष्ट्रवादी विचार व कार्य
**प्रा. रघुनाथ व्यंकटी घाडगे, कळंब** ||60

20) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार
**प्रा. तात्यासाहेब शिवाजी काटकर, सोलापूर** ||62

21) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महिला सक्षमीकरण विषयक विचार
**डॉ. वासुदेव एस. वले, जळगाव** ||64

22) राजर्षी शाहूंचे शैक्षणिक विचार
**प्रा. कांतराव किसनराव कलाणे, बीड** ||66

23) मा. जोतीबा फुले यांचे शेती व शेतकरी संदर्भात विचार आणि कार्य
**प्रा. आबासाहेब गायकवाड, प्रा.डॉ. बी. डब्लू. गुंड, तुळजापूर** ||69

24) राजर्षी शाहू महाराजांचे कार्य व वर्तमान स्थिती
**प्रा. डॉ.अंबादास बिराजदार, तुळजापूर** ||71

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

**16**

# छत्रपती राजर्षी शाहु महाराज यांचे शैक्षणिक कार्य

**प्रा.डॉ. हारणे महादेव माणिकराव**
राज्यशास्त्र विभाग,
व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, उस्मानाबाद

पाश्चात्य शिक्षणाच्या प्रभावामुळे एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धात ज्या सामाजिक क्रांतीच्या चळवळी सुरु झाल्या. त्या चळवळीचे महात्मा जोतीबा फुले, लोकहितवादी देशमुख व आगरकर आदी अग्रणी. १८९० ते १८९५ या काळात दिवंगत झाले. त्यांच्या निधनामुळे सामाजिक क्रांतीची लाट ओसरते की काय असा संभ्रम निर्माण झाला. याच वेळी एक ऐन विशीतील तारणाबांड, राजबिंडा पुरुष पुढे सरसावला आणि महात्मा फुले यांनी पेटविलेली सामाजिक क्रांतीची मशाल त्याने आपल्या हाती घेतली. हा पुरुष म्हणजेच कोल्हापुरचा छत्रपती शाहु राजा होय. कोल्हापुर संस्थानात सर्वच क्षेत्रात व सर्वच पातळीवरील लोकांना आपल्या राजपदाचा उपयोग करुन देणारा राजा राजर्षी शाहू होते. त्यांनी सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, क्रिडा, सांस्कृतीक क्षेत्रात विशेष धोरण तयार केले. त्यांची प्रभावी अमलबजावणी केली. त्यांच्या या धोरणामुळे ते आरक्षण धोरणाचे जनक झाले. तर कोल्हापुर राज्य हे वसतिग्रहाची जननी झाली.

राजर्षी शाहु महाराजांचे व्यक्तीमत्व मोठे उत्तुंग व आगळे वेगळे आहे. राजर्षी शाहुंचा जन्म २६ जुन १९७४ रोजी झाला. राजर्षी शाहू महाराजांच्या व्यक्तीमत्वाची ओळख समाजक्रांतीकारक राजा म्हणुन झाली. १ एप्रिल १८९१ रोजी शाहू महाराजांचा विवाह बडोदा येथील गुणाजीराव खानविलकर यांची कन्या लक्ष्मीबाई यांच्या बरोबर झाला. वयाच्या २० व्या वर्षी २ एप्रिल १८९४ रोजी राज्यकारभाराची सुत्रे आपल्या हाती घेतली. राजर्षी शाहूनी आपल्या राज्यामधुन जी धोरणे राबवली त्यामधुन त्यांचे व्यक्तीमत्व हे लोकप्रिय राजा म्हणून जनतेसमोर आले. राजपदाचा वापर हा सर्व सामान्य जनतेच्या हितासाठी करावयाचा असतो हे शाहू महाराजांनी अनेक वेगवेगळया प्रकारचे कार्याच्या माध्यमातुन करुन दाखविले. त्यापैकी शैक्षणिक कार्य हे अतिमहत्वाचे आहे.

राजर्षी शाहु महाराजांनी त्यांच्या करवीर संस्थानामध्ये जे क्रांतीकारक निर्णय घेवुन समाज परिवर्तन घडविण्यासाठी जी अनेक पाऊले उचलली त्यात शिक्षण हा महत्वपुर्ण घटक आहे. असे म्हणता येईल की, महात्मा फुलेंनी पेटवलेली शिक्षण प्रसाराची क्रांतीज्योत पुढे नेण्याचे महत्वपुर्ण कार्य केले. "विद्येविना मती गेली, मती विना गती गेली, गतीवीना वित्त गेले, वित्त विना शुद्र खचले, एवढे अनर्थ एका अविद्येने केले." तसेच दुस्युचा पोवाडा मध्ये विद्येचा अंकुर कराल तर देशोधडीला जाल, डाग वंशाला असे महात्मा फुले यांनी सांगितले. हंटर कमिशनकडे सुध्दा शिक्षणाचे महत्व पटवून सांगितले. महात्मा फुलेची शिक्षण प्रसारच्या कार्याची प्रेरणा घेवून आपल्या राज्यात राजर्षी शाहूंनी शिक्षण प्रसाराची चळवळ सुरु केली.

राजर्षी शाहु महाराजांनी जी शिक्षण विषयक मोहिम त्यांच्या राज्यात राबविली तीचे दोन भागात विभागणी करता येते. इ. स. १८९४ ते इ. स. १९०४ व इ. स. १९०५ ते इ. स. १९२२ या दोन कालखंडात शिक्षणावरील खर्च कमी होता. दुसऱ्या कालखंडात तो वाढत गेल्याचे दिसून येते. प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, तांत्रिक शिक्षण, उच्च शिक्षण असे स्तर शिक्षणाचे तयार केले. प्राथमिक शिक्षणावर अधिक भर दिला. राजर्षी शाहु महाराज म्हणतात, शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही. अशी त्यांची प्रामाणिक इच्छा होती. शिक्षण प्रसाराचे वृत्त घेऊन एक निष्ठेने तन-मन-धन अर्पण करुन शिक्षणाच्या प्रसारासाठी राजर्षी शाहु अहोरात्र प्रयत्न करुन शिक्षण क्षेत्रात अमुलाग्र परिवर्तन घडवून आणण्यासाठी काही महत्वपुर्ण निर्णय घेतले त्याची अमलबजावणीही करण्यात आली.

**१. राज्यातील शिक्षण क्षेत्रातील नेमणूका :-**

प्राथमिक ते उच्च शिक्षण या टप्पातुन वाटचाल करण्याच्या हेतुने त्यांनी काही धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी जी समिती नेमली त्या समितीचे अध्यक्षपद पिराजीराव घाटगे यांच्याकडे सोपवण्यात आले. त्यांच्या सोबत भास्कर जाधव, रावबहादुर, म. ग. डोंगरे, अ. बा. लवठे, वाय. के. दिलवर, डॉ. एम. एम. घाटगे यांची सदस्य म्हणुन नियुक्ती केली. समितीकडून राज्यात राबवणाऱ्या शिक्षणविषयक धोरणासंबधी प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी शिक्षण विभागाची निर्मीती करुन तेथे प्रमुखपद निर्माण करण्याची गरज राजर्षी शाहुंना महाराजांना वाटली. त्यामुळे पुर्वीचे उपशिक्षणाधिकारी पद रद्द करुन प्रमुख शिक्षणाधिकारी या पदाची निर्मीती करण्यासंबधीचा आदेश २७ सप्टेंबर १८९५ रोजी काढण्यात आला. राज्यातील सर्व शाळा शिक्षणाधिकारी यांच्या ताब्यात देवुन त्यांच्या पगारात वाढ करण्यात आली. महिन्याला त्यांना ६० रुपये पगार दिला जावू लागला. राज्याचे पहिले शिक्षणाधिकारी होण्याचा मान पदोन्नतीने व्ही. के. किर्तीकर यांना देण्यात आला.

ज्या शाळा करवीर राज्यात कार्यरत असत त्यांच्यावर पंच नेमणूक करण्याची परंपरा अस्तित्वात होती. परंतु या पंचांना कोणत्याही प्रकारचे अधिकार दिले जात नव्हते. राजर्षी शाहूंनी त्यांची पून:स्थापन करुन समिती अधिकार व सत्तेचे बळ देण्याचे कार्य केले. शिक्षक हा वतनानुसार व परंपरेनुसार चालणारा व्यवसाय नाही त्यामुळे

वतनाऐवजी शिक्षकांस वेतन देवून नेमणूक करावी असा निर्णय त्यांनी इ. स. १९१३ ला घेतला. वेतनी शिक्षक योजना सुरु झाली. त्यामुळे कोल्हापुर संस्थानामध्ये असलेली अलुते-बलुते, महार व कुलकर्णी वतने व्यापक समाज हिताच्या दृष्टीने नष्ट केली. त्याप्रमाणेच शिक्षण, शाळा आणि शिक्षक येथील वतनी पध्दत नष्ट करण्यात आली वेतनी शिक्षक नेमला पाहिजे असे सांगणारे राजर्षी शाहु हे पहिलेच राजा होते.

**२. दर्जेदार शिक्षण व शिक्षणप्रसारासाठी कार्य :-**

वेतनी शिक्षक तर नेमलाच त्याची गुणवत्ता सुधारली पाहिजे यासाठीसुध्दा प्रयत्न राजर्षी शाहूंनी केली. जर शिक्षक प्रशिक्षित असेल तर चांगले दर्जेदार शिक्षण विद्यार्थीना मिळेल अशी त्यांची भावना होती. यासाठी त्यांनी एक अध्यापक विद्यालयही सुरु केले. आपल्या राज्यात सर्वांसाठी मोफत व सक्तीचे शिक्षण देत असलोत तरी त्याची गुणवत्ता कमी होऊ नये म्हणून अल्प मुदतीच्या प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करणे तसेच प्रशिक्षण घेतलेल्याचे मुल्यमापन करण्यात येऊ लागले. शिक्षणाची व्याप्ती वाढविण्यासाठी प्रत्येक गावात शाळा असली पाहीले. त्यासाठी त्यांनी २८ मे १९१३ रोजी आदेश काढला खेडयामध्ये जिथे मोकळया जागा आहेत. देऊळ, चावडी, धर्मशाळा अशा कोणत्याही ठिकाणी उपलब्ध जागेवर शाळा सुरु कराव्यात असे आदेश दिले. आपल्या राज्यातील शिक्षणापासुन वंचीत असलेल्या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे कार्य त्यांनी केले. धार्मिक बंधने, आर्थिक हालाकीची स्थिती यामुळे मुले-मुली शिक्षण घेऊ शकत नव्हते. त्यांनी शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांना फी-माफीचा आदेश २० मे १९११ रोजी दिला गेला. राज्यातील निरक्षरता कमी करण्यासाठी काही तरी महत्वपुर्ण निर्णय द्यावे लागतील त्या दृष्टीने विचार करुन १९१५-१६ साली शाहुंनी निर्णय घेतला की सक्तीचे व मोफत शिक्षण धोरण तयार करण्याचे आदेश दिले.

**३. विविध शिक्षण संस्थाची निर्मीती :-**

शिक्षणाचा प्रचार व प्रसारासाठी राजर्षी शाहु महाराज यांनी विविध संस्थेची निर्मीती केली व्यवसायीक शिक्षण हे युवकांना मिळाले पाहिजे या उद्देशाने आपल्या राज्यात व्यवसायीक शिक्षण संस्थांची निर्मीती केली. लष्करी शिक्षणासाठी इन्फंट्री स्कूल तर व्यवसायीक प्रशिक्षणासाठी जयसिंगराव घाटगे टेक्नीकल इन्सिटयुट यामध्ये सुतारकाम, लोहारकाम, चित्रकला इ. शिक्षणाची सोय केली.

अस्पृष्य मुलांच्या शिक्षणाकडे शाहू महाराजांचे विशेष लक्ष होते. करवीर राज्य वगळता इतरत्र अस्पृष्त मुलांसाठी स्वतंत्र शाळा सुरु केल्या होत्या. अशा स्वतंत्र शाळा बंद करुन अस्पश्यांना एकत्र बसवण्यात येत असे त्या शाळेतील शिवाशीव व भेदभाव नष्ट केला. १९०० ते १९०१ मध्ये सहा शाळांमधुन १९६ विद्यार्थी, मुस्लिम विद्यार्थीचा चार उर्दु-मराठी शाळा मधून ९६२ विद्यार्थी शिक्षण घेत होते. सर्व शाळा मधून अस्पश्य व स्पृष्य विद्यार्थीना समान वागणूक मिळाली पाहिजे. शिवाय अस्पश्यंची प्रत्येक तऱ्हेने काळजी घेतली पाहिजे असा हूकूम शाहु महाराजानी जानेवारी १९१९ मध्ये काढला होता. या हुकुमात महाराज म्हणतात की शिक्षण संस्था गरिब लोकाकरीता असून गरीबातील गरीब जे अस्पृष्य त्यांना समतेच्या पायावर वागवणे योग्य आहे. अस्पृष्य लोकांना जास्त समतेने, आदराने वागवावे कारण स्पृश्य लोक कोणत्याही प्रकारे शिक्षणात आपला मार्ग काढू शकतात परंतु अस्पृश्यांना ते असाध्य असल्यामुळे कोणताही मार्ग नाही. अस्पृश्याना समानतेने वागवले. नाही तर शिक्षकांना जाब द्यावा लागेल व अशा संस्थांचे अनुदान थांबविले जाईल असेही महाराजांनी बजावले होते.

राजर्षी शाहू महाराजांनी प्रत्येक गावात शाळा काढण्याचा आदेश दिला. पोलीस पाटील, कुलकर्णी यांनी त्या शाळेसाठी मदत करावी असेही आदेशात म्हटले आहे. महाराजांनी सत्यशोधक शाळाही त्या काळात काढली होती. सत्यशोधक समाजातील बुध्दिमान कार्यकर्ते विठ्ठलराव ढोणे यांनी ही शाळा सांभाळली. प्रत्येक गावात पाटील नेमण्याची प्रथा होती त्यामुळे या पटलांना प्रशिक्षीत करण्यासाठी पाटील शाळांची संकल्पना राबवली. शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार व्हावा म्हणून महाराजांनी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजना सुरु केली त्यामुळे गरिब विद्यार्थीना एकप्रकारची मदतच झाली. त्याच प्रध्दतीने खेडयातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे म्हणून संयुक्त वसातिग्रहे, जातीनुसार वसातिगृहे सुरु केले.

**समारोप :-**

महात्मा फुलेंच्या नंतर शैक्षणिक चळवळ गतिमान करणारा मानुस म्हणजे छत्रपती राजर्षी शाहू महाराज होत. आपल्या राज्यातील जनता साक्षर झाली पाहिजे. तरुणांना शिक्षण घेउुन रोजगार उपलब्ध झाला पाहिजे. अशा या प्रयत्नांना त्यांना चांगलेच यश प्राप्त झाले आहे. पु. ल. देशपांडे म्हणतात, अधुनिक काळातील परिस्थिती शाहू महाराजांनी तर कुठल्याही क्षणी इंग्रजी सरकार त्यांना पदच्यूत करुन देशोधडीला लावीन याचा शाश्वती नसलेल्या काळात वावरत होते. मर्यादीत सत्ता असलेल्या आपल्या संस्थांनात निरक्षरतेतून बाहेर पडणारा निर्णय समाज निर्माण करण्याची धडपड करीत होते. कार्ल मार्क्स म्हणतात, सर्व प्रश्नांचे उत्तर हे शिक्षण हेच होय, राजर्षी शाहू महाराज यांनी शिक्षण आपल्या जनतेतील लोकापर्यंत पोहचवून त्यांच्या व्यक्तीमत्व विकासाचा प्रयत्न केला.

**संदर्भ :-**

१. राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग सचिवालय, मुंबई.
२. डॉ. जयसिंगराव पवार, राजर्षी शाहू महाराज स्मृतीग्रंथ
३. डा. धनंजय कीर, राजर्षी शाहू महाराजांचे चरित्र.
४. डॉ. ज्योती डोईफोडे, समाजशास्त्रीय विचारवंत.
५. डॉ. साहेबराव गाठाळ, थोर समाजसुधारक. ❑❑❑

Vidya Vikas Mandal Pathrud's,

# SHANKARRAO PATIL MAHAVIDYALAYA BHOOM

Tq. Bhoom Dist. Osmanabad-413504 (Maharashtra)

NAAC Re-accredited with 'B' Grade

(In Collaboration with Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad)



## One Day Interdisciplinary National Conference

on

## " CONTRIBUTION OF SHAHU MAHARAJ, MAHATMA PHULE & DR. BABASAHEB AMBEDKAR"

(27th February, 2020)

This is to certify that Prof./Dr./Shri./Smt./ Harge Mahadev Manikrao

Of V. M. College osmanabad has participated in One Day Interdisciplinary National Conference on "Contribution of Shahu Maharaj, Mahatma Phule & Dr. Babasaheb Ambedkar" organized by IQAC of Shankarrao Patil Mahavidyalaya, Bhoom, Dist. Osmanabad On Thursday, 27th February, 2020. He/She Partcipanted / Chaired a session / Presented a paper

on छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचे शैक्षणिक कार्य

| | | |
|---|---|---|
| Prof. Tanaji Borade | Dr. Anuradha Jagdale | Dr. Shrikrishna Chandanshiv |
| Convener | Coordinator, IQAC | Principal |